# गिगाप्लेक्स इस्टेट प्रायव्हेट लिमिटेड

# कार्यकारी सारांश

## १. दृष्टीक्षेप

मेसर्स गिगाप्लेक्स इस्टेट प्रायव्हेट लिमिटेड (यानंतर याचा उल्लेख "जीईपीएल" किंवा "याचिकाकर्ता" असा केला जाईल) ही कंपनीज अधिनियम, १९५६ च्या तरतुदींच्या अंतर्गत बनलेली एक कंपनी असून तिचे नोंदणीकृत कार्यालय प्लॉट. क्र. सी–३०, ब्लॉक 'जी', एसआयडीबीआयसमोर, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई – ४०० ०५१, महाराष्ट्र, भारत येथे आहे.

जीईपीएल प्लॉट क्र. आयटी–५, ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, गाव ऐरोली आणि दिघे, ठाणे, महाराष्ट्र, भारत येथे स्पेशल इकॉनॉमिक झोन (एसईझेड) ॲक्ट, २००५ (२००५ मधील २८) च्या खंड ३ च्या अंतर्गत आयटी आणि आयटीईएसशी संबंधित सेवांसाठी क्षेत्र विशिष्ट स्पेशल इकॉनॉमिक झोन (एसईझेड) स्थापत आहे.

वरील दृष्टीकोनातून, जीईपीएलला प्लॉट क्र. आयटी–४, ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, गाव ऐरोली आणि दिघे, ठाणे, महाराष्ट्र, भारत येथे त्याच्या एसईझेडमध्ये एक मानीव वितरण परवानाधारक आहे. माननीय आयोगाने त्यांच्या २०१४ च्या प्रकरण क्र. १९८ मधील २६ ऑक्टोबर २०१५ तारखेच्या आदेशान्वये, जीईपीएलच्या मानीव वितरण परवानाधारक स्थितीस नोंदीमध्ये घेतलेले आहे आणि नंतर, २३ डिसेंबर २०१५ रोजी जीईपीएलसाठी परवान्याच्या विशिष्ट अटींना अधिसूचित केले आहे.

### १.१ एमईआरसी बहुवर्षीय दर नियमन २०१५ च्या अंतर्गत दाखल करणे

जीईपीएलचे कार्य एक वितरण परवानाधारक म्हणून एप्रिल रोजी सुरु झाले, त्यामुळे जीईपीएलने एप्रिल २०१६ ते सप्टेंबर २०१६ ची वास्तविक आकडेवारी आणि ३ नोव्हेंबर २०१६ रोजी उर्वरित नियंत्रण कालावधीसाठी अनुमान यांच्यावर आधारित एमईआरसी एमवायटी नियमन, २०१४ च्या नियमन ५.१ (अ) (iii) च्या अनुषंगाने आर्थिक वर्ष २०१६२०१७ पासून आर्थिक वर्ष २०१९–२० पर्यंतच्या तिसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी बहुवर्षीय दर याचिका दाखल केलेली आहे. जी इ पी एल च्या सदर याचिकेबाबत माननीय आयोगाने काही त्रुटींविषयी तसेच अधिक माहितीसाठी (डेटा गॅप सेट १) विचारणा केली होती आणि जीईपीएलने ५ डिसेंबर २०१६ रोजी त्यासंदर्भात उत्तरे दाखल केली आहेत. बहुवर्षीय दर याचिकेवरील पहिले तांत्रिक वैधता सत्र (टीव्हीएस) ६ डिसेंबर २०१६ रोजी आयोजित करण्यात आले होते, आणि त्या सत्राच्या आधारे अधिक माहितीसाठी (डेटा गॅप सेट २) विचारणा केली होती, आणि सर्व उत्तरे आणि बदलांना समाविष्ट केल्यानंतर सुधारित याचिका दाखल करण्यास जीईपीएलला निर्देश दिले. त्याच्या अनुषंगाने, जीईपीएलने सर्व उत्तरे आणि बदलांना समाविष्ट केल्यानंतर त्याची सुधारित बहुवर्षीय दर याचिका दाखल केली आहे.

## 2 याचिका दाखल करण्यासाठी अवलंबलेले धोरण

### 2.१ वीज खरेदी

माननीय आयोगाने १८ मे २०१६ तारखेच्या त्याच्या आदेशान्वये जीईपीएल आणि ग्लोबल एनर्जी यांच्यादरम्यान अल्प–कालीन विजेच्या खरेदीसाठी पीपीएला मंजुरी दिली आणि स्पर्धात्मक निविदांद्वारे प्राप्त दर अवलंबण्यास मान्यता दिली. याशिवाय,

भांडवली गुंतवणूक योजनेच्या अनुषंगाने उल्लिखित भार अनुमानावर आणि आयटी आणि आयटीईएससाठी वर्तमान बाजारपेठ परिस्थितीवर आधारित, जीईपीएलने एफओओ मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुषंगाने स्पर्धात्मक निविदांद्वारे मध्यम– कालावधीसाठी बेस लोड वीज खरेदी करण्यासाठी, आणि अल्प–कालीन व्यवस्था/पॉवर एक्स्चेंजद्वारा पीक लोड वीजखरेदी करण्यासाठी प्रस्ताव दिला आहे.

### 2.2 वितरण व्यवसायासाठी वेगळी लेखा विवरणे

जीईपीएलने कळवले आहे की त्याचा वीज वितरणाचा व्यवसाय एक वेगळी कंपनी नसून, एकंदर कंपनीचा एक विभाग आहे, जो स्पेशल इकॉनॉमिक झोन (एसईझेड) विकासाच्या समावेशासह आयटी/आयटी बिजनेस पार्कच्या विकासासाठी निर्माण केलेले एक स्पेशल पर्पज वेहिकल (एसपीव्ही) आहे. म्हणून, कंपनीज अधिनियम, २०१३ च्या आवश्यकतेनुसार, त्या कंपनीच्या प्रत्येक भागासाठी खंडयुक्त लेखा पुस्तकांसह संपूर्णपणे त्या कंपनीसाठी लेखा बनविल्या जातात. तथापि, नियामक आवश्यकतांच्या दृष्टीकोनातून, जीईपीएलने वीज वितरण व्यवसायासाठी वेगळे विभागीय खाते राखण्यास सुरुवात केली आहे, जिचे लेखा परीक्षण होईल, आणि तिला आर्थिक वर्ष २०१६–१७ साठी संतुलित याचिकेसह सादर केले जाईल.

### 2.३ नियंत्रण कालावधीसाठी वायर्स बिजनेस आणि सप्लाय बिजनेससाठी एआरआरचे विलगन

जीईपीएलने माननीय आयोगाद्वारा विहित प्रारुपात वायर्स बिजनेस आणि सप्लाय बिजनेससाठी वेगळे एआरआर सादर केले आहे. खर्चाच्या वाटपासाठी, एमईआरसी बहुवर्षीय दर नियमन २०१५च्या नियमन ६८ नुसार जेथे खर्चाचे वास्तविक विघटन आणि रेव्हेन्यू उपलब्ध नाही तेथे अलोकेशन मेट्रिक्सचा विचार करण्यात आला आहे, आहे. परंतु, एआरआरमधील इतर घटक जसे कि घसारा, दीर्घ–कालीन कर्जांवरील व्याज, आणि समभागावरील परतावा हे वायर आणि सप्लाय व्यवसायासाठी नियंत्रण कालावधीतील प्रत्येक आर्थिक वर्षांसाठी स्वतंत्रपणे विचारात घेण्यात आलेल्या आहेत.

### २.४ बहुवर्षीय दर नियंत्रण कालावधीसाठी अवलंबलेले धोरण

आर्थिक वर्ष २०१६–१७ ते आर्थिक वर्ष २०१९–२० या तिसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी विजेचे व्हीलिंग आणि विजेचा किरकोळ पुरवठा यांच्यासाठी एआरआर आणि प्रशुल्क एमईआरसी बहुवर्षीय दर नियमन २०१५ च्या अनुषंगाने व्यक्त करण्यात आले आहे.

या अनुषंगाने, आर्थिक वर्ष २०१६–१७ पासूनपुढे, जीईपीएल प्रस्ताव करीत आहे की जीईपीएलचे एआरआर आणि दररचना निर्धारित होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात स्वीकारण्यात आलेल्या मराविमं दरांच्या कमालमर्यादेशी जोडण्याच्या पद्धतीशी न जोडता ते जीइपीएलच्या प्रस्तावित वर्गवारीनुसार करण्यात यावी.

## ३ नियंत्रण कालावधीसाठी एकंदर महसुलीची आवश्यकता (एआरआर )

### ३.१ वीज विक्री

जीईपीएलने संपूर्ण **बहुवर्षीय दर** नियंत्रण कालावधीसाठी विक्री व्यक्त करण्यासाठी वास्तविक उर्जा विक्रीस आधार म्हणून विचारात घेतले आहे. नियंत्रण कालावधीतील वीज विक्री निर्धारित करण्यासाठी जीईपीएलने निर्माणाधीन आणि अगोदरच बांधलेल्या इमारतींच्या वर्तमान आणि भविष्यातील वापर विचारात घेतलेला आहे.

### ३.2 वीज वितरण नुकसान

जीईपीएलने वास्तविक वीज विक्री आणि प्राप्त उर्जा यांच्यावर आधारित एप्रिल ते सप्टेंबर २०१६ या कालावधीसाठी वास्तविक वितरण नुकसानाला विचारात घेतले आहे. मागील सहा महिन्यांच्या माहितीच्या आधारावर, असे आढळून आले आहे की इमारत क्र. २ आणि ३ च्या आंशिक वापरामुळे, वितरण रोहित्र पूर्णपणे भारयुक्त केले नसल्याने वीज वितरण नुकसान हे एप्रिल २०१६ मधील ०.१५ः वरून वाढून सप्टेंबर महिन्यात २.५३ः पर्यंत झाले. यानुसार सहा महिन्यांसाठी सरासरी वितरण नुकसान १.४५ टक्के आहे. वर्तमान इमारतींचा वापर येत्या काही वर्षांमध्ये वाढणार असतानाच, सुरुवातीच्या काही वर्षांमध्ये नव्या इमारतींच्या बांधकामामुळे शून्य भार नुकसान कमी होत जाणार आहे. त्यामुळे, जीईपीएलने आर्थिक वर्ष २०१६—१७ साठी आणि नियंत्रण कालावधीसाठी १.४५ टक्के वीज वितरण नुकसानाचा प्रस्ताव ठेवला आहे.

### ३.३ वीज संतुलन

माननीय आयोगाद्वारा २०१६ च्या प्रकरण क्र. ६१ मधील २२ जुलै २०१६ तारखेच्या आदेशानुसार जीईपीएलने नियंत्रण कालावधीसाठी इंट्रास्टेट ट्रान्समिशन नुकसान ३.६२ टक्के विचारात घेतले आहे.

### ३.४ वीज खरेदी योजना

जीईपीएलच्या अनुमानानुसार नियंत्रण कालावधीसाठी विजेची मागणी आणि आवश्यकता खालीलप्रमाणे आहेतः

**तक्ता ३—१ः नियंत्रण कालावधीसाठी अनुमानित मागणी आणि उर्जेची आवश्यकता**

| वर्ष | बेस लोड (२४x७) | | पीक लीड (सकाळी ८:०० पासून ते रात्री २३:०० वाजेपर्यंत, सोमवार ते शुक्रवार) | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महत्तम मागणी (एमडब्ल्यू) | वापर (एमयू) | महत्तम मागणी (एमडब्ल्यू) | वापर (एमयू) | महत्तम मागणी (एमडब्ल्यू) | वापर (एमयू) |
| २०१७—१८ | २.२५ | १६.७१ | २.१५ | ८.८२ | ४.४० | २८.५३ |
| २०१८—१९ | ४.१५ | ३६.३५ | ४.१५ | १७.७७ | ८.३० | ५४.१३ |
| २०१९—२० | ६.५० | ५७.१० | ५.५० | 24.13 | 12.00 | ८०.६८ |

### तक्ता ३–२: नियंत्रण कालावधीसाठी अनुमानित वीज खरेदीचा खर्च

| तपशील | स्रोत | आर्थिक वर्ष २०१६–२०१७ | आर्थिक वर्ष २०१७–२०१८ | आर्थिक वर्ष २०१८–२०१९ | आर्थिक वर्ष २०१९–२०२० |
|---|---|---|---|---|---|
| वीज खरेदी प्रमाण (एमयू) | बेस लोड आणि पीक लोड | ११.६५ | २८.५३ | ५४.१३ | ८१.२२ |
| | सोलार आरपीओसाठी खरेदी | | – | – | – |
| | नॉन–सोलार आरपीओसाठी खरेदी | – | – | – | – |
| | वजाः अतिरिक्त विजेची खरेदी | – | – | – | – |
| | **एकूण** | **११.६५** | **2८.५३** | **५४.१३** | **८१.22** |
| वीज खरेदी खर्च (रु. कोटींमध्ये) | बेस लोड आणि पीक लोड | ४.४७ | ६.८० | १८.६० | 2७.६० |
| | सोलार आरईसीची खरेदी | ०.०४ | ०.२० | ०.४२२ | १.०० |
| | नॉन–सोलार आरईसीची खरेदी | ०.१८ | ०.४५ | ०.८६ | १.४० |
| | वजाः अतिरिक्त विजेची खरेदी | – | – | – | – |
| | **एकूण** | **४.६६** | **१०.४५** | **२०.०१** | **३०.३०** |
| सरासरी वीज खरेदी खर्च (रु. ध्के डब्ल्यूएच) | बेस लोड आणि पीक लोड | ३.७३ | ३.४४ | ३.४४ | ३.४३ |
| | सोलार आरईसीची खरेदी | ३.५० | ३.५० | ३.५० | ३.५० |
| | नॉन–सोलार आरईसीची खरेदी | १.५० | १.५० | १.५० | १.४० |
| | वजाः अतिरिक्त विजेची खरेदी | – | – | – | – |
| | **एकूण** | **४.०३** | **३.६६** | **३.७०** | **३.७३** |

### ३.५ ट्रान्समिशन चार्जेस आणि एमएसएलडीसी चार्जेस

जीईपीएलने २०१६ च्या प्रकरण क्र. ६१ मध्ये २२ जुलै २०१६ तारखेच्या माननीय आयोगाद्वारा जारी इंट्रास्टेट ट्रान्समिशन टॅरिफ ऑर्डरवर आधारित नियंत्रण कालावधीसाठी रु. ०.२८/केडब्ल्यूएच, रु. ०.३२/के डब्ल्यूएच, रु. ०.३४/केडब्ल्यूएच आणि रु. ०.३२/केडब्ल्यूएच या ट्रान्समिशन चार्जेसना अनुमानित केले आहे. याशिवाय, माननीय आयोगाद्वारा मंजूर अल्पकालीन ओपन एक्सेसवर आधारित एमएसएलडीसी चार्जेस, म्हणजेच रु. २२५० प्रति दिवसाच्या शेड्युलिंग चार्जेस आणि रु. ४००० प्रति महिन्याची अप्लिकेशन फी विचारात घेतल्या आहेत.

सध्या, जीईपीएल एक अल्पकालीन ओपन एक्सेस (ओए) कस्टमर म्हणून ट्रान्समिशन चार्जेस आणि एमएसएलडीसी चार्जेस देत आहे, कारण जीईपीएलने अजून दीर्घकालीन/मध्यमकालीन पीपीएमध्ये प्रवेश केलेला नाही, जे एमईआरसी (ट्रान्समिशन ओपन एक्सेस) नियमने, २०१६ च्या अंतर्गत जरुरी आवश्यकता आहे. तथापि, वितरण परवानाधारक असल्यामुळे, जीईपीएलला एमईआरसी बहुवर्षीय दर नियमन, २०१५ च्या अनुषंगाने टीटीएससी आणि एमएसएलडीसी चार्जेस घेण्याचे हक्क प्राप्त आहेत. या संदर्भात, जीईपीएल विनम्रपणे सादर करते की माननीय आयोगाने एमईआरसी बहुवर्षीय दर नियमन, २०१५ च्या तरतुदींच्या अनुषंगाने नियंत्रण कालावधी दरम्यान देय अशा टीटीएससी आणि एमएसएलडीसी चार्जेसच्या त्याच्या हिश्श्याला निश्चित करावे.

### ३.६ संचालन आणि सुव्यवस्थेविषयी खर्च

जीईपीएलसाठी संचालन आणि सुव्यवस्थेविषयी खर्च विशिष्ट प्रकरणानुसार निश्चित केले जावे. याच्या अनुसार, जीईपीएलने नियंत्रण कालावधीसाठी त्याच्या संचालन आणि सुव्यवस्थेविषयी खर्चाला खालील अंतर्गत व्यक्त केले आहेः

**कर्मचारी खर्च**

जीईपीएलने के रहेजा कॉर्पोरेट सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड (केआरसीएसपीएल) सोबत एक कॉर्पोरेट सर्विस करार केला आहे. उक्त करारानुसार, आर्थिक वर्ष २०१६—१७ साठी उर्जेच्या विक्रीच्या ३५ पैसे प्रति युनिट कर्मचाऱ्यांचा खर्च केआरसीएसपीएलला देय असेल आणि पुढील वर्षांसाठी सामान्य स्तरावर येण्यासाठी दर वर्षी १२ टक्क्यांनी वाढ करण्यात येईल. त्यानुसार, सामान्य स्तराची गणना ३६ पैसे/केडब्ल्यूएच, ४४ पैसे/केडब्ल्यूएच, आणि ४६ पैसे/केडब्ल्यूएच अनुक्रमे आर्थिक वर्ष २०१७—१८, आर्थिक वर्ष २०१८—१६, आणि आर्थिक वर्ष २०१६—२० साठी असेल.

केआरसीएसपीएलसोबत ही प्रस्तावित व्यवस्था अधिक किफायतशीर आहे, कारण पूर्ण काळ कर्मचाऱ्यांचा वापर कमी झाला असता. विक्रीच्या प्रमाणाच्या अनुसार, अभियांत्रिकी, प्रशासन, कायदेशीर बाबी, आर्थिक, लेखा, मानव संसाधन आदींसारख्या प्रत्येक सहाय्यक कार्यासाठी जर कर्मचाऱ्यांना कामावर घेतले, तर ते अधिक खर्चिक ठरले असते. एमबीपीपीएल सीमित क्षेत्रात काम करत असल्यामुळे, सर्व सहाय्यक सेवांसाठी कर्मचाऱ्यांची आवश्यकता पूर्ण काळ असणार नाही आहे. त्यामुळे, याच्यासाठी आवश्यकतेनुसार केआरसीएसपीएलकडून विविध कार्यांसाठी कॉर्पोरेट सर्विसेस सहाय्यता घेणे दूरदर्शीपणाचे आहे.

माननीय आयोगाला हे जाणून खुशी होईल की केआरसीएसपीएलच्या वेतनश्रेणीवर असलेले कर्मचारी फक्त जीईपीएलसाठी काम करत नाहीत आणि त्यामुळे जीईपीएलसाठी आकार घेण्याची पद्धत विक्रीच्या प्रति युनिट आधारावर ठरविण्यात आले. जर जीईपीएलने स्वतःच्या श्रेणीवर कर्मचाऱ्यांना पूर्णवेळ आधारावर नियुक्त केले असते, तर वर उल्लेख केल्यानुसार, कर्मचाऱ्यांचा खर्च केआरसीएसपीएलकडून घेतलेल्या सेवांच्या खर्चाच्या तुलनेत जास्त झाला असता. बाहेरून काम करवून घेण्याचे मॉडेल कर्मचाऱ्यांच्या आंशिक वापरामुळे खास करून स्वस्त पडते, आणि जर केआरसीएसपीएलने जीईपीएलसाठी खास करून नियुक्त्या केल्या असत्या, तरी देखील त्या करारात उल्लेख केलेल्या सध्याच्या आकारांपेक्षा जास्त झाले असते, आणि बाहेरून काम करून घेणे निरर्थक ठरले असते. माननीय आयोग कर्मचारी खर्च अत्यल्प करण्यासाठी आणि संसाधनांच्या वापरासाठी या प्रस्तुत मॉडेलची निश्चितच प्रशंसा करेल.

**आर आणि एम खर्च**

जीईपीएलने प्रति तंत्रज्ञ या आधारावर वितरण प्रणालीच्या दुरुस्ती आणि देखभालीसाठी तंत्रज्ञ पुरविण्यासाठी वत्स इलेक्ट्रिक कंपनीबरोबर एक करार केला आहे. आरआणिएम विक्रेते/ठेकेदार यांची संक्षिप्त सूची बनविण्यासाठी जीईपीएलने वीज वितरणात असलेल्या आणि पुरेसा अनुभव असलेल्या तीन विक्रेत्यांकडून कोट्स मागविल्या. मेसर्स वत्स इलेक्ट्रिक कंपनी एल१ बोली लावणारी ठरली आणि जीईपीएलने ११ फेब्रुवारी २०१६ रोजी त्यांच्यासोबत ठेका/करार केला. मेसर्स वत्स इलेक्ट्रिक कंपनी त्याच सेवा एमबीपीपीएल, टीपीडीडीएल दिल्ली, टीपीसी—डी मुंबई, क्रॉम्प्टन ग्रीव्हज जळगाव, आणि एस्सेल इन्फ्रा नागपूर आदी इतर वितरण परवानाधारक आणि फ्रेंचायझी यांना देत आहे. या करारात, ७ टक्क्यांची वृद्धी घटक, जो घाऊक किमतीच्या निर्देशांकामधील सामान्य वार्षिक वाढीच्या दृष्टीने डिसेंबर २०१४ पर्यंतच्या तीन वर्षांच्या कालावधीसाठी आहे, त्याला पुढील वर्षांसाठी आरआणिएम खर्च व्यक्त करण्यासाठी विचारात घेतले जाते. त्या सोबत, जीईसीएल देखील साहित्य, सुटे भाग आणि उपभोग्य वस्तू, केबल दुरुस्ती आदींवर काही निश्चित खर्च करते, जे आर्थिक वर्ष २०१६—१७ च्या एच१ साठी वास्तविक खर्चावर आधारित व्यक्त केलेला आहे आणि नियंत्रण कालावधीमध्ये संपत्ती वाढविण्याचा विचार करीत आहे.

**ए आणि जी खर्च**

आर्थिक वर्ष २०१६–१७ च्या एच१ मधील तात्पुरते खर्च आर्थिक वर्ष २०१६–१७ साठी खर्चाचा अंदाज काढण्यासाठी दुप्पट करण्यात आले आहेत. त्यानंतर, इतर उपयोगितांसाठी अलीकडच्या एमवायटी ऑर्डर्समध्ये माननीय आयोगाद्वारा केल्या गेलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगात, डब्ल्यूपीआयसाठी ६० टक्के अधिभार आणि सीपीआयसाठी ४० टक्के अधिभार विचारात घेत, संबंधित वर्षांच्या एप्रिलपासून मार्चपर्यंत तीन वर्षांच्या सरासरी चलनवृद्धीवर आधारित, बहुवर्षीय दर नियमन २०१५ मध्ये अनुबद्ध कार्यक्षम घटकासाठी १ टक्का कमी केल्यानंतर, २.६७ टक्क्याचा वृद्धी घटक विचारात घेतला आहे.

आणखी, संचालन आणि सुव्यवस्था खर्चांचे वाटप अलोकेशन मेट्रिक्समध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार वायर्स बिजनेस आणि सप्लाय बिजनेस यांच्यामध्ये ६५:३५ अशा अनुपातात केलेले आहे.

प्रस्तावित संचालन आणि सुव्यवस्था खर्च वास्तविक कर्मचाऱ्यांना घेतले असते तर होऊ शकणाऱ्या संचालन आणि सुव्यवस्था खर्चांपेक्षा फारच कमी आहेत.

**३.७ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण**

जीईपीएलने ११ जुलै २०१६ रोजी माननीय आयोगाला सादर केलेल्या डिटेल्ड प्रोजेक्ट रिपोर्ट (डीपीआर) वर आधारित नियंत्रण कालावधीसाठी भांडवली खर्च आणि भांडवलीकरण प्रस्तावित केला आहे. १६ एप्रिल २०१६ रोजी वितरण कार्याला आरंभ करण्यापूर्वी जीईपीएलकडे भांडवलीकृत संपत्ती रु. ४.८३ कोटी रुपयांची होती आणि आर्थिक वर्ष २०१६–२०१७ साठी तिला आरंभीचे जीएफए म्हणून विचारात घेण्यात आले आहे.

नियंत्रण कालावधीसाठी प्रस्तावित भांडवली खर्च आणि भांडवलीकरण खालीलप्रमाणे आहेत:

**तक्ता ३–३: नियंत्रण कालावधीसाठी अनुमानित भांडवली खर्च आणि भांडवलीकरण खालीलप्रमाणे आहेत (रु. कोटींमध्ये)**

| तपशील | आर्थिक वर्ष २०१६–२०१७ | आर्थिक वर्ष २०१७–२०१८ | आर्थिक वर्ष २०१८–२०१९ | आर्थिक वर्ष २०१९–२०२० |
|---|---|---|---|---|
| **भांडवली खर्च** | २०.३८ | ३६.५५ | ३२.४२ | ०.३० |
| **भांडवलीकरण** | २०.३८ | ३६.५५ | ३२.४२ | ०.३० |

**३.८ कर्ज: इक्विटी अनुपात**

एमईआरसी बहुवर्षीय दर नियमन २०१५ च्या नियमन २६ मध्ये दिलेल्या जीईपीएलने प्रमाणानुसारी कर्ज:समभाग अनुपात ७०:३० असा ठेवला आहे. आणखी, पुढील खंडात चर्चा केल्यानुसार, जीईपीएलने सर्विस कनेक्शन चार्जेससाठी कोणतेही शेड्युल ऑफ चार्जेस घेण्याचे निश्चित केलेले नाही, त्यामुळे उपभोक्ता योगदान नियंत्रण कालावधीसाठी शून्य ठरविण्यात आले आहे.

**३.९ घसारा**

जीईपीएलने त्या वर्षाच्या दरम्यान सरासरी जीएफएवर ५.२८ टक्क्यांच्या सरासरी घसारा दराने लागू करत, एमईआरसी बहुवर्षीय दर नियमन २०१५ च्या नियमन २७ च्या अनुसार स्वतंत्रपणे वायर्स आणि रिटेल सप्लाय बिजनेसच्या वितरणासाठी घसाऱ्याची गणना केली आहे

**३.१० कर्जावरील व्याज**

जीईपीएलने कर्जावर व्याज एमईआरसी बहुवर्षीय दर नियमन २०१५ च्या नियमन २६ च्या अनुसार व्याजाची गणना केली आहे. एमईआरसी बहुवर्षीय दर नियमन २०१५ च्या अनुषंगाने त्या वर्षासाठी व्यक्त केलेला घसाऱ्याच्या बरोबर प्रमाणानुसारी परतफेड राखण्याचे विचारात घेतले आहे. जीईपीएलच्या वितरण परवानाधारकडे कोणतीही कर्जे नसल्यामुळे. व्याजाचा दर एमईआरसी बहुवर्षीय दर नियमन २०१५ च्या नियमन २६.४ च्या चौथ्या तरतुदीच्या अनुषंगाने, १ एप्रिल २०१६ रोजी संपूर्णपणे जीईपीएलच्या वास्तविक कर्ज पोर्टफोलिओवरील व्याजाच्या भारित सरासरी दरावर आधारित राखण्याचे विचारात घेतले आहे.

### ३.११ खेळते भांडवल आणि उपभोक्तांच्या प्रतिभूती ठेवीवरील व्याज

जीईपीएलने एमईआरसी बहुवर्षीय दर नियमन २०१५ च्या नियमन ३१ च्या अनुसार खेळत्या भांडवलीवरील प्रमाणानुसारी व्याजाची गणना केली आहे. खेळत्या भांडवलीच्या गरजेची गणना करण्यासाठी, प्रचलित प्रशुल्कावरील विजेच्या विक्रीचे महसूल विचारात घेतले पाहिजे. जीईपीएलसाठी प्रचलित प्रशुल्क वायर्स आणि सप्लाय बिजनेससाठी संयुक्त प्रशुल्क आहे, आणि त्यामुळे वायर्स आणि सप्लाय बिजनेससाठी प्रचलित प्रशुल्कावर स्वतंत्र महसूल निश्चित केला जाऊ शकत नाही. त्यामुळे, वायर्स आणि सप्लाय बिजनेसाठी खेळत्या भांडवलीवर व्याज एमईआरसी बहुवर्षीय दर नियमन २०१५ मध्ये विनिर्दिष्ट अलोकेशन मेट्रिक्सनुसार निर्धारित केले जाते.

जीईपीएलने सीएसडीला आर्थिक वर्ष २०१६–१७ साठी वर्तमान प्रशुल्कातून एका महिन्याच्या महसुलीइतका आणि आर्थिक वर्ष २०१७–१८ नंतरपासून प्रस्तावित प्रशुल्कातून एका महिन्याच्या महसुलीइतका कंझ्युमर सेक्युरिटी डिपॉझिट (सीएसडी) विचारात घेत सीएसडी अनुमानित केला आहे, कारण सुधारित प्रशुल्के आर्थिक वर्ष २०१७–१८ नंतरपासून लागू होण्याची शक्यता आहे. आयओडब्ल्यूसी आणि सीएसडीच्या गणनेसाठी व्याज दर याचिका दाखल करण्याच्या तारखेवर असलेला एसबीआयचा लागू बेस रेट (९.३० टक्के) अधिक १५० बेसिस पॉइंट्स विचारात घेत १०.८० टक्के निर्धारित करण्यात आला आहे.

### ३.१2 इक्विटीवर परतावा

स्वतंत्रपणे वायर्स आणि सप्लाय बिजनेसाठी, जीईपीएलने एमईआरसी बहुवर्षीय दर नियमन २०१५ च्या नियमन २८ च्या अनुषंगाने नियंत्रण कालावधीसाठी समभाग भांडवलीवरील परताव्याची गणना केली आहे.

### ३.१३ आयकर

अद्ययावत लेखापरीक्षित लेखांच्या अनुसार वास्तविक आयकर जीईपीएलसाठी उपलब्ध नाही आहे, कारण एक वितरण परवानाधारक म्हणून याने एक वर्षाचे कार्य पूर्ण करायचे बाकी आहे. आणखी, जीईपीएल, एसईझेड विकासक असल्यामुळे इतर व्यवसायांमध्ये देखील गुंतलेले आहे, आणि त्यामुळे जीईपीएलद्वारा दिले गेलेले/देय आयकर नियमन ३३.१ च्या तरतुदीच्या अंतर्गत, वर पुनरुत्पादित केल्याप्रमाणे नियमन केलेल्या वितरण व्यवसायाकडे निर्धारित केले पाहिजे.

प्रस्तुत बहुवर्षीय दर याचिकेत, जीईपीएलने एमएटी दरावर, त्याला बुक प्रॉफिट समजत, अनुमानित आरओईवर नियंत्रण कालावधीसाठी आयकराचे अनुमान केले आहे. तसेच, नियंत्रण कालावधीसाठी हा एक अनुमान आहे, आणि मागील वर्षांचा कोणताही इतिहास उपलब्ध नाही आहे, कारण जीईपीएलने आर्थिक वर्ष २०१६–१७ मध्येच एक वितरण परवानाधारक म्हणून काम चालू केले. वास्तविक आयकर दायित्त्व संतुलित करण्याच्या वेळी संतुलित केले जाईल.

### ३.१४ बुडित कर्जांचे तरतुदीकरण

जीईपीएलने बुडित कर्जांचे तरतुदीकरण करणे विचारात घेतले नाही कारण नियंत्रण कालावधीदरम्यान कोणतीही प्राप्त होणारी बाकी उल्लिखित नाही आहे, आणि तसेच, सध्या आर्थिक वर्ष २०१६–१७ साठी लेखा परिक्षित लेखा नसल्यामुळे, प्राप्य रकमा देखील, जरी असल्यास, ज्ञात नाहीत.

### ३.१५ आकस्मिक राखीव निधीसाठी योगदान

जीईपीएलने एमईआरसी बहुवर्षीय दर नियमन २०१५ च्या नियमन ३४ च्या अनुषंगाने आकस्मिक राखीव निधीसाठी स्थिर मत्तेच्या मूळ किमतीच्या ०.५ टक्के योगदानाला विचारात घेतले आहे.

### ३.१६ नॉन–टॅरिफ उत्पन्न

जीईपीएलने टेंडर दस्तावेजांच्या विक्रीसाठी रिटेल सप्लाय बिजनेससाठी रु. ०.०१ कोटीच्या नॉन–टॅरिफ उत्पन्नाचा अनुमान केला आहे. जीईपीएलने बहुवर्षीय दर याचिकेत आकस्मिक राखीव निधीच्या अनुमानासाठी योगदान आणि जीएफएवर आधारित आकस्मिक राखीव निधीसाठी योगदानाच्या गुंतवणुकीमधून व्याजाच्या उत्पन्ननाबद्दल नॉन–टॅरिफ उत्पन्नाचा अनुमान केला आहे. जीईपीएलने ओपन एक्सेस देवघेवींसाठी प्रक्रियण शुल्के आणि संचालन शुल्कांमधून कोणत्याही नॉन–टॅरिफ उत्पन्नाचा अनुमान केला नाही आहे, कारण ओपन एक्सेससाठी कदाचित कोणताही उपभोक्ता अनुमती देणार नाही. आणखी, जर असल्यास, ओपन एक्सेस प्रमाणाला व्यक्त करणे कठीण आहे, आणि म्हणून माननीय आयोग अशा कोणत्याही उत्पन्न, संतुलनाच्या वेळी विचारात घेऊ शकते. सोबत, परवानाधारक क्षेत्राच्या संपत्तीच्या वापरातून नियंत्रण कालावधीदरम्यान उल्लिखित असे अन्य कोणतेही व्यावसायिक उत्पन्न नाही आहे.

### ३.१७ एकंदर महसुलीची आवश्यकता

नियंत्रण कालावधीसाठी वायर बिजनेसच्या वितरणासाठी अनुमानित एआरआर खालील तक्त्यात संक्षेपित केले आहेः

**तक्ता ३–४: नियंत्रण कालावधीसाठी वायर बिजनेसच्या वितरणासाठी अनुमानित एआरआर (रु. कोटींमध्ये)**

| अ.क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०१६–२०१७ | आर्थिक वर्ष २०१७–२०१८ | आर्थिक वर्ष २०१८–२०१९ | आर्थिक वर्ष २०१९–२०२० |
|---|---|---|---|---|---|
| १. | संचालन आणि सुव्यवस्था खर्च | ०.७६ | १.२९ | २.२६ | ३.३० |
| २. | घसारा | ०.७१ | २.१९ | ३.६३ | ४.७४ |
| ३. | कर्ज भांडवलीवर व्याज | १.०५ | ३.१२ | ५.४४ | ६.२० |
| ४. | खेळत्या भांडवलीवरील व्याज | ०.००१ | ०.००२ | ०.००६ | ०.०१२ |
| ५. | उपभोक्तांच्या प्रतिभूती ठेवींवरील व्याज | ०.०१ | ०.०२ | ०.०४ | ०.०५ |
| ६. | खराब आणि संशयास्पद कर्जांसाठी तरतूद | – | – | – | – |

| अ.क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०१६—२०१७ | आर्थिक वर्ष २०१७—२०१८ | आर्थिक वर्ष २०१८—२०१९ | आर्थिक वर्ष २०१९—२०20 |
|---|---|---|---|---|---|
| ७. | आकस्मिक राखीव निधीचे योगदान | ०.०२ | ०.१२ | ०.३१ | ०.४७ |
| ८. | आयकर | ०.१२ | ०.३८ | ०.६८ | ०.८३ |
| **९.** | **एकूण महसुली खर्च** | **२.६८** | **७.१३** | **१२.६५** | **१५.६०** |
| १०. | समभागावर परतावा | ०.६५ | १.९९ | ३.४८ | ४.३३ |
| **११.** | **एकंदर महसुलीची आवश्यकता** | **३.३३** | **९.१२** | **१६.२३** | **१९.९३** |
| १२. | वजाः नॉन टॅरिफ उत्पन्न | ०.०० | ०.०० | ०.०१ | ०.०२ |
| **१३.** | **निव्वळ एकंदर महसुलीची आवश्यकता** | **३.३३** | **९.१२** | **१६.22** | **१९.९१** |

जीईपीएल वर तक्त्यात दाखविल्याप्रमाणे, नियंत्रण कालावधीसाठी वायर्स बिजनेससाठी अनुमानित एआरआर मंजूर करण्यासाठी माननीय आयोगाकडे विनंती करत आहे.

नियंत्रण कालावधीसाठी रिटेल सप्लाय बिजनेससाठी अनुमानित एआरआर खालील तक्त्यात संक्षेपित केले आहेः

**तक्ता ३—५ः नियंत्रण कालावधीसाठी रिटेल सप्लाय बिजनेसाठी अनुमानित एआरआर (रु. कोटींमध्ये)**

| अ.क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०१६—२०१ | आर्थिक वर्ष २०१७—२०१८ | आर्थिक वर्ष २०१८—२०१९ | आर्थिक वर्ष २०१९—२०20 |
|---|---|---|---|---|---|
| १. | वीज खरेदी खर्च | ४.६९ | १०.४५ | 20.०१ | ३०.३० |
| २. | संचालन आणि सुव्यवस्था खर्च | ०.४१ | ०.७० | १.2१ | १.७८ |
| ३. | घसारा | ०.०१ | ०.०३ | ०.०५ | ०.०६ |
| ४. | कर्ज भांडवलीवर व्याज | ०.०१ | ०.०३ | ०.०४ | ०.०६ |
| ५. | खेळत्या भांडवलीवरील व्याज | ०.०१२ | ०.०२१ | ०.०५२ | ०.१०६ |
| ६. | उपभोक्तांच्या प्रतिभूती ठेवींवरील व्याज | ०.०७ | ०.१७ | ०.३२ | ०.४५ |
| ७. | खराब आणि संशयास्पद कर्जासाठी तरतूद | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ८. | आकस्मिक राखीव निधीचे योगदान | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०१ |
| ९. | राज्यांतर्गत ट्रान्समिशन चार्जेस | ०.०० | ०.९१ | १.८४ | २.६० |
| १०. | एमएसएलडीसी फीज आणि चार्जेस | ०.०० | ०.०६ | ०.०६ | ०.०६ |
| ११. | आयकर | ०.०० | ०.०० | ०.०१ | ०.०१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **१२.** | **एकूण महसुली खर्च** | **५.२१** | **१२.४१** | **२३.६४** | **३५.४६** |
| १३. | समभागावर परतावा | ०.०१ | ०.०२ | ०.०४ | ०.०५ |
| **१४.** | **एकंदर महसुलीची आवश्यकता** | **५.२२** | **१२.४३** | **२३.६८** | **३५.५१** |
| १५. | वजाः नॉन टॅरिफ उत्पन्न | ०.०१ | ०.०० | ०.०० | ०.०० |
| **१६.** | **निव्वळ एकंदर महसुलीची आवश्यकता** | **५.२१** | **१२.४३** | **२३.६८** | **३५.५१** |

जीईपीएल नियंत्रण कालावधीसाठी सप्लाय बिजनेससाठी, वर तक्त्यात दाखविल्याप्रमाणे अनुमानित एआरआरला मंजूर करण्याची विनंती करत आहे.

## ४ एमवायटी नियंत्रण कालावधीसाठी टॅरिफ फिलॉसॉफी आणि टॅरिफ डिझाईन

### ४.१ वर्तमान टॅरिफवर रेव्हेन्यू गॅप/(सरप्लस)

वर्तमान टॅरिफ वायर्स आणि रिटेल सप्लायच्या वितरणासाठी एक संयुक्त प्रशुल्क असल्यामुळे, नियंत्रण कालावधीसाठी संयुक्त रेव्हेन्यू गॅपचा अनुमान करण्यात आला आहे.

**तक्ता ४–१: नियंत्रण कालावधीसाठी अनुमानित वर्तमान टॅरिफवर रेव्हेन्यू गॅप/(सरप्लस) (रु. कोटींमध्ये)**

| अ.क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०१६–२०१७ | आर्थिक वर्ष २०१७–२०१८ | आर्थिक वर्ष २०१८–२०१९ | आर्थिक वर्ष २०१९–२०20 |
|---|---|---|---|---|---|
| १. | वितरण वायरस बिजनेससाठी एआरआर | ३.३३ | ९.१२ | १६.२२ | १९.९१ |
| २. | रिटेल सप्लाय बिजनेससाठी एआरआर | ५.२१ | १२.४३ | २३.६८ | ३५.५१ |
| ३. | संयुक्त वायरस बिजनेस आणि रिटेल सप्लाय साठी एआरआर | ८.५४ | २१.५५ | ३९.८९ | ५५.४२ |
| ४. | वजाः वर्तमान प्रशुल्कावर महसूल | ८.९१ | २०.४१ | ३८.२६ | ४७.०२ |
| ५. | रेव्हेन्यू गॅप/(सरप्लस) | **(०.३७)** | **१.१४** | **१.६३** | **(१.६०)** |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की आर्थिक वर्ष २०१६–१७ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठी अनुमानित रेव्हेन्यू सरप्लस आहे, आणि आर्थिक वर्ष २०१७–१८ आणि आर्थिक वर्ष २०१८–१९ साठी अनुमानित रेव्हेन्यू गॅप आहे. त्यामुळे, वायर्स बिजनेस आणि सप्लाय बिजनेसच्या एआरआरची वसुली करण्याच्या दृष्टीने प्रशुल्क त्याच्या अनुषंगाने समायोजित करणे आवश्यक आहे.

नियंत्रण कालावधीसाठी सुधारित प्रशुल्काकडून वसुली करावयाचा एव्हरेज कॉस्ट ऑफ सप्लाय (एसीओएस) खालीलप्रमाणे निश्चित केला जातो:

**तक्ता ४–2: नियंत्रण कालावधीसाठी सुधारित प्रशुल्काकडून अनुमानित महसुलीची आवश्यकता (रु. कोटींमध्ये)**

| अ.क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०१६–२०१७ | आर्थिक वर्ष २०१७–२०१८ | आर्थिक वर्ष २०१८–२०१९ | आर्थिक वर्ष २०१९–२०2 |
|---|---|---|---|---|---|
| १. | (वायर, रिटेल सप्लाय बिजनेस)साठी एआरआर | ८.५४ | 2१.५५ | ३९.८९ | ५५.42 |

| अ.क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०१६–२०१७ | आर्थिक वर्ष २०१७–२०१८ | आर्थिक वर्ष २०१८–२०१९ | आर्थिक वर्ष २०१९–२०2 |
|---|---|---|---|---|---|
| 2. | वीज विक्री (एमयू) | ११.४८ | 27.02 | ५१.25 | ७६.६१ |
| ३. | पुरवठ्याचा सरासरी खर्च (रु./ केडब्ल्यूएच) | ७.४४ | ७.६८ | ७.७८ | ७.21 |

### ४.२ व्हीलिंग चार्जेसचे निर्धारण

एचटी आणि एलटी गटांसाठी सामान्य व्हीलिंग चार्जेस प्रस्तावित केले असून ते वायर्स बिजनेस आणि अनुमानित उर्जा विक्रीसाठी एआरआरवर आधारित आहेत ते खालीलप्रमाणे आहेत:

**तक्ता ४–३: नियंत्रण कालावधीसाठी प्रस्तावित व्हीलिंग चार्जेस**

| अ.क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०१६–२०१७ | आर्थिक वर्ष २०१७–२०१८ | आर्थिक वर्ष २०१८–२०१९ | आर्थिक वर्ष २०१९–२०२० |
|---|---|---|---|---|---|
| १. | वायर्स बिजनेसच्या वितरणासाठी एआरआर (रु. कोटींमध्ये) | ३.३३ | ६.१२ | १६.२२ | १९.६१ |
| २. | वीज विक्री (एमयू) | ११.४८ | २७.०२ | ५१.२५ | ७६.६१ |
| ३. | व्हीलिंग चार्जेस (रु./केडब्ल्यूएच) | २.९० | ३.३८ | ३.१६ | २.५६ |

जीईपीएलने माननीय आयोगाकडे वर उल्लेख केल्यानुसार नियंत्रण कालावधीसाठी वर प्रस्तावित व्हीलिंग चार्जेस मंजूर करण्यासाठी विनंती करत आहे.

### ४.३ रिटेल सप्लाय टॅरिफवरसाठी तत्त्वज्ञान

जीईपीएल नियंत्रण कालावधीसाठी रिटेल सप्लाय प्रशुल्काच्या निर्धारणासाठी खालील प्रशुल्क तत्त्वज्ञानचा प्रस्ताव ठेवत आहे:

**क्रॉस–सबसिडीमध्ये कपात**

सध्या, जीपीएलच्या पुरवठ्याच्या क्षेत्रासाठी लागू कमाल प्रशुल्क औद्योगिक आणि व्यापारी गटांसाठी एमएसईडीसीएलचे प्रशुल्क आहे. एमएसईडीसीएलच्या पुरवठ्याच्या क्षेत्रातील उपभोक्ता गटांमधील क्रॉस सबसिडीज एक ऐतिहासिक वारसा आहेत, आणि माननीय आयोग दर वर्षी योग्य प्रशुल्क रचनेद्वारा क्रॉस सबसिडीज कमी करण्याचा प्रयत्न करीत आहे. जर तीच प्रशुल्क रचना जीईपीएलच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात चालू ठेवली, तर क्रॉस–सबसिडी व्यापारी आणि औद्योगिक उपभोक्तांदरम्यान चालू राहील.

विद्युत अधिनियम, २००३ ने देखील परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात एका क्रमवर्धी पद्धतीने क्रॉस–सबसिडीजच्या क्रमवार घटाचे महादेश दिले आहेत. विद्युत अधिनियम, २००३ च्या या उद्दिष्टाला प्राप्त करण्यासाठी, आणि जीईपीएलसाठी पहिल्यांदाच प्रशुल्क निर्धारित करत येत असल्यामुळे, जीईपीएलची इच्छा आहे की त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात आरंभापासूनच उपभोक्ता गटांदरम्यान क्रॉस–सबसिडी असू नये. त्यामुळे, जीईपीएलने अशा गटानुसार प्रशुल्काचा प्रस्ताव ठेवला आहे ज्यात प्रत्येक उपभोक्ता गटासाठी एव्हरेज बिलिंग रेट (एबीआर) एव्हरेज कॉस्ट ऑफ सप्लाय (एसीओएस) च्या समकक्ष असावा. यामुळे जीईपीएलच्या पुरवठा क्षेत्रातील क्रॉस–सबसिडी कमी होईल/हटेल आणि उपभोक्त्याला लाभ मिळेल.

**प्रशुल्क गटांचे परिमेयकरण**

वर्तमान प्रशुल्क वेळापत्रक जीईपीएलच्या पुरवठ्याच्या क्षेत्रासाठी लागू आहे, ज्यात दोन एचटी गटांचा समावेश आहे, ते म्हणजे एचटी औद्योगिक (एचटी– I) आणि एचटी व्यापारी (एचटी– II) आणि दोन एलटी गट, ज्यात तीन आणि दोन उप–गट आहेत, ते म्हणजे, एलटी व्यापारी (एलटी II–ए, एलटी II–बी आणि एलटी II–सी) आणि एलटी औद्योगिक (एलटी ट–बी (i) आणि एलटी ट–बी(ii)).

जीईपीएलने सुधारित प्रशुल्कासाठी खालील गटांचा/उप–गटांचा प्रस्ताव केला आहेः

(अ) एचटी पुरवठा गट (एचटी)

(ब) एलटी पुरवठा गट आणि भार $\leq$ २० केडब्ल्यू (एटी ए)

(क) एलटी पुरवठा गट आणि २० केडब्ल्यू (एटी ब) वरील भार

**टाईम ऑफ डे टॅरिफ**

जीईपीएल पुरवठा क्षेत्रातील टीओडी प्रशुल्काशी संबंधित बाबी खाली संक्षेपित स्वरूपात दिल्या आहेतः

(अ) जीईपीएल क्षेत्रातील उपभोक्तांना नियत भार रचना असते आणि ते नियत कामाच्या तासांद्वारा संचालित केले जातात. अशा उपभोक्तांचा भार केवळ नाईट ऑफःपीक रिबेट सुरु केले या कारणास्तव नाईट अवर्समध्ये बदली होण्याची संभावना नसते.

(ब) टीओडी प्रशुल्काचे उद्दिष्ट अतिरिक्त महसूल कमवायचे नसते, तर कारण उपभोक्ता त्यांच्या वापराला स्थानांतरीत करू शकत नाहीत, पण पीक ते ऑफ–पीक तासांमध्ये वापराला हलविण्यासाठी प्रलोभन देणे, वीज खरेदी खर्च कमी करणे हे असतात.

(क) एसईझेड क्षेत्राच्या भाराची रचना समजल्यावर, जीईपीएलने अगोदरच दोन विभिन्न वेळांच्या स्लॉटससह विजेला संकुचित करत त्याच्या विजेच्या खरेदीला अत्यल्प केले आहे.

(ड) जीईपीएलकडे दुपारच्या वेळी त्याचा पीक लोड असतो, त्यामुळे सायंकाळच्या पीक अवर्सकडून दुपारच्या वेळेकडे लोड हलविण्याची गरज नसते.

जीईपीएलने त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रासाठी टाईम ऑफ डे प्रशुल्क बंद करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. जीईपीएलने माननीय आयोगाकडे आर्थिक वर्ष २०१६–१७ च्या नंतरपासून जीईपीएलच्या पुरवठा क्षेत्रासाठी टाईम ऑफ डे प्रशुल्क बंद करण्यासाठी विनम्रपणे विनंती केली आहे.

**फिक्स्ड चार्जेस आणि डिमांड चार्जेसमध्ये वाढ**

बीईएसटी, आरइन्फ्रा–डी आणि टीपीसी–डीसाठी माननीय आयोगाद्वारा जारी अलीकडच्या टॅरिफ ऑर्डर्समध्ये, नियत शुल्के /डिमांड चार्जेसद्वारा नियत खर्चाच्या वसुलीत वाढ करण्यासाठी नियत शुल्के आणि मागणी शुल्के किंचित वाढविलेले आहेत. त्याच्या अनुषंगाने, जीईपीएलने सुद्धा नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी माननीय आयोगाद्वारा मंजूर पातळीवर नियत शुल्के आणि मागणी शुल्के वाढविण्याचा प्रस्ताव केला आहे.

### ४.४ आर्थिक वर्ष २०१६–१७ ते आर्थिक वर्ष २०१९–२० पर्यंत नियंत्रण कालावधीसाठी प्रशुल्क प्रस्ताव

अगोदरच्या परिच्छेदात चर्चा केल्यानुसार प्रशुल्क तत्त्वज्ञानावर आधारित, जीईपीएलने आर्थिक वर्ष २०१६–१७ ते आर्थिक वर्ष २०१९–२० पर्यंत नियंत्रण कालावधीसाठी खालील प्रशुल्क प्रस्ताव केला आहे. हा प्रस्ताव अशा तऱ्हेने आहे ज्यात प्रत्येक प्रशुल्क गटासाठी एव्हरेज बिलिंग रेट हा एव्हरेज कॉस्ट ऑफ सप्लायशी जुळेल.

**तक्ता ४–४: नियंत्रण कालावधीसाठी प्रस्तावित प्रशुल्क**

| वर्ष | उपभोक्ता गट | नियत शुल्के (रु./महिना)/ मागणी शुल्के (रु./केव्हीए/महिना) | वीज शुल्के (रु./केडब्ल्यूएच) | व्हीलिंग चार्जेस (रु./केडब्ल्यूएच) |
|---|---|---|---|---|
| आर्थिक वर्ष २०१६–२०१७ | एचटी | २३०.०० | ३.६५ | २.६० |
| | एलटी ए (०–२० केडब्ल्यू) | २८०.०० | ४.२४ | २.६० |
| | एलटी बी (>२० केडब्ल्यू) | २३०.०० | ४.३१ | २.६० |
| | | | | |
| आर्थिक वर्ष २०१७–२०१८ | एचटी | २५०.०० | ४.१० | ३.३८ |
| | एलटी ए (०–२० केडब्ल्यू) | २६०.०० | ४.३५ | ३.३८ |
| | एलटी बी (>२० केडब्ल्यू) | २५०.०० | ४.५२ | ३.३८ |
| | | | | |
| आर्थिक वर्ष २०१८–२०१९ | एचटी | २४०.०० | ४.१६ | ३.१६ |
| | एलटी ए (०–२० केडब्ल्यू) | ३००.०० | ४.४० | ३.१६ |
| | एलटी बी (>२० केडब्ल्यू) | २४०.०० | ४.६३ | ३.१६ |
| | | | | |
| आर्थिक वर्ष २०१९–२020 | एचटी | २६०.०० | ४.१७ | २.५६ |
| | एलटी ए (०–२० केडब्ल्यू) | ३१०.०० | ४.४१ | २.५६ |
| | एलटी बी (>२० केडब्ल्यू) | २६०.०० | ४.६२ | २.५६ |

जीईपीएल वर प्रस्तावित केल्यानुसार नियंत्रण कालावधीसाठी गटानुसार प्रशुल्क मंजूर करण्यासाठी माननीय आयोगाकडे विनम्रपणे विनंती करत आहे.

प्रस्तावित प्रशुल्कामध्ये प्रत्येक उपभोक्ता गटासाठी एव्हरेज बिलिंग रेट हा एव्हरेज कॉस्ट ऑफ सप्लायशी जुळत असल्यामुळे, क्रॉस–सबसिडी हटविण्याचा प्रस्ताव दिला आहे. नियंत्रण कालावधीदरम्यान प्रस्तावित **क्रॉस–सबसिडी क्षेपपथ खाली तक्त्यात दिला आहेः**

तक्ता ४–४: नियंत्रण कालावधीसाठी दरम्यान प्रस्तावित क्रॉस–सबसिडी क्षेपपथ



| वर्ष | गट | पुरवठ्याचा अनुमानित सरासरी खर्च (रु./केडब्ल्यूएच) | सरासरी बिलिंग रेट (रु./केडब्ल्यूएच) | | | एव्हरेज बिलिंग रेट आणि पुरवठ्याचा अनुमानित सरासरी खच यांचा अनुपात (टक्के ) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सध्याचे प्रशुल्क | मागील ऑर्डर | प्रस्तावित प्रशुल्क | सध्याचे प्रशुल्क | मागील ऑर्डर | प्रस्तावित प्रशुल्क |
| आर्थिक वर्ष २०१६–२०१७ | एचटी | ७.४४ | ७.६३ | ७.२० | ७.४४ | १०७ टक्के | ९७ टक्के | १०० टक्के |
| | एलटी ए (०–२० केडब्ल्यू) | | ५.६१ | ५.२५ | ७.४४ | ७६ टक्के | ७१ टक्के | १०० टक्के |
| | एलटी बी (>२० केडब्ल्यू) | | ६.८६ | ६.०३ | ७.४४ | ९३ टक्के | ८१ टक्के | १०० टक्के |
| | | | | | | | | |
| आर्थिक वर्ष २०१७–२०१८ | एचटी | ७.६८ | ७.४४ | ७.२० | ७.६८ | ९३ टक्के | ९० टक्के | १०० टक्के |
| | एलटी ए (०–२० केडब्ल्यू) | | ७.४४ | ५.२५ | ७.६८ | ९३ टक्के | ६६ टक्के | १०० टक्के |
| | एलटी बी (>२० केडब्ल्यू) | | ७.४४ | ६.०३ | ७.६८ | ९३ टक्के | ७६ टक्के | १०० टक्के |
| | | | | | | | | |
| आर्थिक वर्ष २०१८–२०१९ | एचटी | ७.७८ | ७.६८ | ७.२० | ७.७८ | १०३ टक्के | ९३ टक्के | १०० टक्के |
| | एलटी ए (०–२० केडब्ल्यू) | | ७.६८ | ५.2५ | ७.७८ | १०३ टक्के | ६८ टक्के | १०० टक्के |
| | एलटी बी (>२० केडब्ल्यू) | | ७.६८ | ६.०३ | ७.७८ | १०३ टक्के | ७७ टक्के | १०० टक्के |
| | | | | | | | | |
| आर्थिक वर्ष २०१९–२०2० | एचटी | ७.2१ | ७.७८ | ७.२० | ७.२१ | १०८ टक्के | १०० टक्के | १०० टक्के |
| | एलटी ए (०–२० केडब्ल्यू) | | ७.७८ | ५.२५ | ७.२१ | १०८ टक्के | ७३ टक्के | १०० टक्के |
| | एलटी बी (>२० केडब्ल्यू) | | ७.७८ | ६.०३ | ७.२१ | १०८ टक्के | ८४ टक्के | १०० टक्के |

### ४.४ क्रॉस सबसिडी सरचार्जचे निर्धारण

जीईपीएलने खाली दिल्याप्रमाणे टॅरिफ पॉलिसीमध्ये विहित सुत्रीकरणाचा अवलंब करत सीएसएसची गणना केली आहेः

**तक्ता ४–६ टक्के नियंत्रण कालावधीसाठी प्रस्तावित क्रॉस–सबसिडी सरचार्ज**

| वर्ष | उपभोक्ता गट | टी | सी | एल | सी/(१–एल/१००) | डी | सीएसएस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रु./केडब्ल्यूएच | रु./केडब्ल्यूएच | टक्के | रु./केडब्ल्यूएच | रु./केडब्ल्यूएच | रु./केडब्ल्यूएच |
| आर्थिक वर्ष २०१६–२०१७ | एचटी | ७.४४ | ४.०३ | ५.३७ टक्के | ४.२६ | ३.१८ | ०.०० |
| | एलटी ए (०–२० केडब्ल्यू) | ७.४४ | ४.०३ | ५.३७ टक्के | ४.२६ | ३.१८ | ०.०० |
| | एलटी बी (>२० केडब्ल्यू) | ७.४४ | ४.०३ | ५.३७ टक्के | ४.२६ | ३.१८ | ०.०० |
| आर्थिक वर्ष २०१७–२०१८ | एचटी | ७.६८ | ३.६६ | ५.३७ टक्के | ३.८७ | ३.७० | ०.४१ |
| | एलटी ए (०–२० केडब्ल्यू) | ७.६८ | ३.६६ | ५.३७ टक्के | ३.८७ | ३.७० | ०.४१ |
| | एलटी बी (>२० केडब्ल्यू) | ७.६८ | ३.६६ | ५.३७ टक्के | ३.८७ | ३.७० | ०.४१ |
| आर्थिक वर्ष २०१८–२०१९ | एचटी | ७.७८ | ३.७० | ५.३७ टक्के | ३.९१ | ३.४० | ०.३७ |
| | एलटी ए (०–२० केडब्ल्यू) | ७.७८ | ३.७० | ५.३७ टक्के | ३.९१ | ३.४० | ०.३७ |
| | एलटी बी (>२० केडब्ल्यू) | ७.७८ | ३.७० | ५.३७ टक्के | ३.९१ | ३.४० | ०.३७ |
| आर्थिक वर्ष २०१९–२०२० | एचटी | ७.२१ | ३.७३ | ५.३७ टक्के | ३.९४ | २.९१ | ०.३६ |
| | एलटी ए (०–२० केडब्ल्यू) | ७.२१ | ३.७३ | ५.३७ टक्के | ३.९४ | २.९१ | ०.३६ |
| | एलटी बी (>२० केडब्ल्यू) | ७.२१ | ३.७३ | ५.३७ टक्के | ३.९४ | २.९० | ०.३६ |

जीईपीएलने वर प्रस्तावित केल्यानुसार नियंत्रण कालावधीसाठी गट–निहाय क्रॉस सबसिडी सरचार्जला मंजुरी देण्यासाठी माननीय आयोगाकडे विनम्रपणे विनंती केली आहे.

### ४.६ शेड्युल ऑफ चार्जेस

२६ ऑक्टोबर २०१५ तारखेच्या आदेशान्वये माननीय आयोगाने पुरवठ्याच्या एमएसईडीसीएल क्षेत्रात लागू असलेल्या जीईपीएलच्या पुरवठा क्षेत्रासाठी त्याच शेड्युलला मंजुरी दिली आहे.

जीईपीएल एका संकुलात असलेल्या उपभोक्तांना सेवा देत आहे, त्यामुळे, जोडणी कापणे, पुनः जोडणी करणे, जोडणीसाठी अर्ज करणे आदींसाठी उपभोक्तांना सेवा देण्यात अतिरिक्त खर्च नाही आहे. तथापि, अशा काही निश्चित सेवा आहेत, जसे ओपन एक्सेससाठी प्रक्रियण शुल्के, ओपन एक्सेससाठी संचालन शुल्क आणि धनादेश न वटण्याच्या प्रकरणी प्रशासकीय चार्जेस, ज्यांच्यासाठी जीईपीएलने शुल्के लावण्याचा निर्णय घेतला आहे.

याच्या दृष्टीकोनातून, जीईपीएलने तिसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी खालील शेड्युल ऑफ चार्जेसचा प्रस्ताव केला आहेः

| अ.क्र. | शेड्युल ऑफ चार्जेस | उपयोज्य (होय/नाही) | प्रस्तावित शुल्के | कारणे |
|---|---|---|---|---|
| १. | धनादेश न वटण्याच्या प्रकरणी प्रशासकीय शुल्के | होय | धनादेशाची रक्कम कुठलीही असली तरी रु. ३५०/– | धनादेश न वटण्याच्या प्रकरणी, बँक धनादेशाची रक्कम विचारात न घेता परवानाधारकावर रु. ३५०/– चा आकार लावते, आणि ही रक्कम एआरआरवर लोड न करता त्या विशिष्ट उपभोक्ताकडून घेतली जाते. |
| २. | ओपन एक्सेससाठी प्रक्रियण शुल्के | होय | प्रति अर्ज रु. २५००/– | याचिकाकर्त्याला आजपर्यंत अशा प्रकारचा अर्ज मिळालेला नाही. तथापि, ओए अर्ज भविष्यात येऊ शकतो, आणि त्यासाठी प्रक्रियण खर्च होऊ शकतो. परंतु, माननीय आयोगाने एमबीपीपीएलसाठी प्रति अर्ज रु. २५००/– मंजूर केला आहे, आणि तोच जीईपीएलसाठी प्रस्तावित आहे. |
| ३. | ओपन एक्सेससाठी संचालन शुल्के | होय | प्रति अर्ज रु. २५००/– | याचिकाकर्त्याला आजपर्यंत अशा प्रकारचा अर्ज मिळालेला नाही. परंतु, माननीय आयोगाने एमबीपीपीएलसाठी प्रति अर्ज रु. २५००/– मंजूर केला आहे, आणि तोच जीईपीएलसाठी प्रस्तावित आहे. |

## ४ प्रार्थना

**जीईपीएल माननीय आयोगाकडे खालील प्रार्थना करतेः**

१. वेळोवेळी सुधारणा केलेल्या एमईआरसी (बहुवर्षीय दर) नियमन, २०१५च्या तरतुदींच्या अनुसार बहुवर्षीय दर याचिका सादर करून घेणे आणि माननीय आयोगासमोर पुढील कार्यवाहीसाठी विचारात घेणे;

2. जीईपीएलने प्रस्तावित केल्यानुसार, आर्थिक वर्ष २०१६–१७ ते आर्थिक वर्ष २०१९–२० साठी एआरआर आणि त्याची वसुली प्रशुल्काच्या द्वारे मंजूर करणे आणि टॅरिफ शेड्युल मंजूर करणे;

३. ट्रान्समिशन चार्जेस आणि एमएसएलडीसी चार्जेसचा जीईपीएलचा हिस्सा निर्धारित करणे, आणि नियंत्रण कालावधीसाठी जीईपीएलसाठी एआरआर मंजूर करतांना त्याचा विचार करणे;

४. मध्यम कालावधी पीपीएवर हस्ताक्षर होईपर्यंत आणखी ६ महिन्यांसाठी ग्लोबल एनर्जीसह वर्तमान लघु कालावधी पीपीएला वाढविण्यासाठी हंगामी शिथिलता देणे;

५ . जीईपीएलच्या पुरवठ्याच्या क्षेत्रासाठी टाईम ऑफ डे टॅरिफ बंद करणे;

६. प्रस्तावित शेड्युल ऑफ चार्जेस उपभोक्तांकडून वसूल करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देणे;

७. अनावधानाने आलेल्या अपवर्जनांना, दोषांना, कमीपणांना क्षमापित करावे आणि जीईपीएलला या फायलिंगमध्ये भविष्यातील तारखेस आवश्यक पडू शकत असलेल्या जोडण्यास/बदलण्यास/सुधारणा करण्यास/दुरुस्त करण्यास आणि आणखी सादरीकरणे करण्यास अनुमती द्यावी; आणि

८. या प्रकरणाच्या तथ्यांमध्ये आणि परिस्थितींमध्ये योग्य ठरणाऱ्या आणि उचित वाटणाऱ्या अशा इतर आणि आणखी आदेशांना पारित करावे.